# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)


**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक ०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## सन २०२२-२३
## (माहे ऑक्टोबर -२०२२ ते सप्टेंबर - २०२३ अखेर)
## श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी
## पेपर कप पुरविणेबाबत फेर ई-निविदा

Scanned by CamScanner

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पेपर कप पुरविणेबाबत ई-निविदा**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षाची किमान सरासरी वार्षिक उलाढाल नमूद असणारे दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. निविदाधारकाची वरील नमूद ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रु.२८,१०,०००/- असणे अनिवार्य राहील.

**C. निविदाधारकाने पेपर कपचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या पेपर कपचे किमान ५० नग पेपर कप नमुने स्वतंत्र लिफाफयामध्ये सिलबंद करून श्री साईबाबा संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. लिफाफयावर आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. पेपर कपचे नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. पेपर कपचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदाधारकाने पेपर कपचे नमुने देताना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या पेपर कपचा संस्थानला पुरवठा होईल.

**D. पुरवठा करावयाच्या पेपर कपचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचे पेपर कपचे स्पेसिफिकेशन्स, मागणी वगैरे सविस्तर तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१४,५२०/- व बयाणा रक्कम रु. १,४५,२००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**E. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि.२२ / ०९ /२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. २९ / ०९ /२०२२ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.



Scanned by CamScanner

२. ई-निविदा भरलेल्या पेपर कपचे नमुने दि.२२ / ०९ /२०२२ ते दि. २९/ ०९ /२०२२ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. ०१ / १० /२०२२ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

**५. सदर पेपर कप पुरविण्याची निविदा फक्त पेपर कप उत्पादकांनीच भरावी.**

६. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील विहीत तक्त्यात नमूद करावे म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

७. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोच करणेचा वाहतूक खर्च तसेच निविदा BOQ मध्ये दिलेल्या स्पेसिफिकेशनप्रमाणे पेपर कपसाठी वापरण्यात येणारा पेपर व पॅकिंगसाठी वापरण्यात येणारा प्लॅस्टिक पेपर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे

**G. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील.

२. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. पेपर कप पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या पेपर कपचा पुरवठा श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील श्री साईबाबा संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी कॅन्टीन विभाग याठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

...२...

Scanned by CamScanner

**I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत पेपर कपचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी सुरक्षा अनामत रक्कम श्री साईबाबा संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पेपर कपचा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

**J. पेपर कप पुरवठा करण्याचा कालावधी व पध्दत -**

१. पेपर कपचा पुरवठा करण्याचा कालावधी १ ऑक्टोबर, २०२२ ते ३० सप्टेंबर, २०२३ असा राहिल.

२. पेपर कप मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दुरध्वनीवरून कळविलेवरही पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर कॅन्टीन सेवा अवलंबून असलेमुळे प्रत्येक महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे पेपर कपची मागणी केली जाईल. एकदम सर्व पेपर कप घेतले जाणार नाहीत. श्री साईबाबा संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी कपचा पुरवठा करावा लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेले कप स्विकारले जाणार नाहीत.

४. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा पेपर कपची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास त्या कपांचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेल्या परिमाणा इतके पूर्ण पेपर कप घेणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

५. **पेपरकप बॉक्सची पॅकिंग ही ५,०००/१०,००० नगाची असावी.**

६. **पेपर कप पॅकिंगसाठी प्लॅस्टिक पेपरची जी पिशवी वापरण्यात येईल त्या पिशवीचा प्लॅस्टिक कागद हा शासनाच्या पर्यावरण GR प्रमाणे ५० मायक्रॉन किंवा त्यापेक्षा जास्त मायक्रॉनचा वापरणे बंधनकारक राहील.**

७. पेपर कप पुरवितांना शक्यतो एका वेळेस किमान ५,००,००० पेपर कप पुरवावे लागतील.

८. पेपर कप तयार करण्यासाठी वापरण्यात येणा-या कागदाला महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाचे दि.२३.०३.२०१८ व दि.३०.०६.२०१८ चे अधिसुचनेनुसार वापरण्यास प्रतिबंध नसावा.

**K. पेपर कप स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील स्पेसिफिकेशनप्रमाणेच पेपर कपचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच पेपर कपचे बिल सादर करावे.

२. ज्या नमुन्याच्या पेपर कपच्या निविदा मंजुर होतील ते सर्व कप मान्य झालेल्या दर्जा व नमुन्याप्रमाणे पुरवावे लागतील. कमी दर्जाचे अगर वेगळ्या प्रकारचे, लिकेज किंवा खराब कप स्वीकारले जाणार नाहीत. अशा पेपर कपचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्या पेपर कपची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर नमुन्याप्रमाणेच पेपर कप पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

...३...

Scanned by CamScanner

४. पुरवठा आदेशाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानकडे पेपर कप पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून त्यांची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास पेपर कप स्वीकारण्यात येतील. पुरवठाधारकांनी निविदेसोबत दिलेल्या पेपर कपच्या कागदाच्या दिलेले नमुन्याप्रमाणे तोच कागद वापरुन पेपर कप पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या कपांची Quantity जास्त असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample पाहून कप स्वीकारले जातात. तथापी कप स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही कप खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागतील. तसेच पुरविलेले कपामध्ये लिकेज असलेले पेपर कप आढळल्यास तेही बदलून दयावे लागतील.

६. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेले कप कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

८. पेपर कप पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

९. पेपरकप हे १८५ GSM व १०० मिली क्षमता असलेले पांढ-या रंगाचे प्लेन पुरविणे बंधनकारक राहील. मंजुर झालेल्या GSM पेक्षा कमी GSM चे व पांढरा रंग सोडून काळपट रंगाचे पेपरकप स्विकारले जाणार नाहीत.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या पेपर कपची गरजेनुसार केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या अगर शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या पेपर कपचे रिपोर्ट Specification नुसार नसल्यास सदर कप बदलून द्यावे लागतील. त्या दरम्यान श्री साईबाबा संस्थानला बाहेरुन कप विकत घ्यावे लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेले कपांच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड, पुरवठाधारकाला देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर पुरविलेले कप वापरले गेले व नंतर लॅब रिपोर्ट Specification प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील कप किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. पुरवठा केलेल्या पेपर कपचे लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस Specification नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थान प्रशासनाकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. लॅबचा रिपोर्ट Specification नुसार नसल्यास गरजेनुसार केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजण्यात येईल.

**M बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या पेपर कपचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. पेपर कपची तपासणी करुन ताब्यात घेतलेले पेपर कपाचे बील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

...४...

Scanned by CamScanner

३. पुरवठाधारकाने पुरविलेले पेपर कप श्री साईबाबा संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून कप खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर देय असलेल्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. एकुण प्राप्त कपांपैकी २% कंप खराब निघाल्यास देयक अदा करताना त्याचा विचार केला जाईल.

५. शासन नियमानुसार बंधनकारक असलेल्या कर कपाती पुरवठाधारकाचे बिलातून करण्यात येतील.

**N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील पेपर कप मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या कपांची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या कपांची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. पेपर कप पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत पेपर कपचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे कप नाकारले गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके कप दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या कपांसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्रीसाईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या पेपर कपच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

३. श्री साईबाबा संस्थानने मंजूर केलेले दराने व निविदेसोबत सादर केलेले नमुन्याप्रमाणे कपांचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने कपांचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन कप खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक पेपर कपचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर श्री साईबाबा संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

**O निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

...५...

Scanned by CamScanner

P. **सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात पेपर कप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या पेपर कपांच्या परिमाणाच्या ५० टक्के पेपर कपाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण पेपर कपांचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने पेपर कपांचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळ्या यादीत समावेश केले जाईल. याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

७. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाने दि.२३.०३.२०१८ व दि.३०.०६.२०१८ नुसार प्लॅस्टिक व पॉली वापराबाबतची अधिसुचना सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहिल. तसेच यापुढे शासनाने पॉलीबाबतचे धोरणात काही बदल केल्यास त्याप्रमाणे सुधारीत लागू झालेले नियम पुरवठाधारकास बंधनकारक राहतील.

८. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

९. निविदाधारकाला सदर ई-निविदेबाबत काही शंका असल्यास अगर काही माहिती पाहिजे असल्यास खरेदी विभाग कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२४२३-२५८७७१ किंवा ०२४२३-२५८७७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासन राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी



Scanned by CamScanner

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------ |
| | | २. ------------------------------------------------ |
| ६. | बँक खाते नांव | १.------------------------------------------------ |
| | शाखा | २. ------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------ |

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



Scanned by CamScanner

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षाची किमान सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

ब) पेपर कपाचे नमुने स्वतंत्र बंद पाकीटामध्ये, पाकीटावर फर्मचे नांव इ. तपशिलासह विहित तारखेला खरेदी विभागात जमा करावे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

दिनांक - / /२०२२
ठिकाण -



Scanned by CamScanner

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२२-२३ करिता कॅन्टीन विभागासाठी पेपर कप पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या कपांचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, श्री साईबाबा संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर पेपर कपांचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त कपांची श्री साईबाबा संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही त्या मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

मान्य दराने पेपर कप पुरवठा करण्याची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे पेपर कप वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२२
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव
(१) ----------------------------------
(२) ----------------------------------

सही/सहया व शिक्का

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे

निविदेसंबंधित व्यवसायाची खालील नमूद आर्थिक वर्षाची उलाढाल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन -२०१८-१९ | |
| २ | सन -२०१९-२० | |
| ३ | सन- २०२०-२१ | |
| | एकूण वार्षिक उलाढाल | |
| | ३ वर्षांची सरासरी उलाढाल | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)

नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२२
ठिकाण :-



Scanned by CamScanner

STATEMENT SHOWING PURCHASE OF PAPER CUP FOR THE YEAR 2022-23

**BOQ**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per No | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 100 ML, Plain White, Paper Cup - 185 GSM (+/-5), Multilayer, 1 PE Paper, Paper Company-ITC/CENTURY/TNPL/JK - Food Grade | 1,91,00,000 | Nos. | | |

(Bhagyashree Banayat.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi



Scanned by CamScanner